ज्योतिबा देवस्थान, मौजे वाडी, रत्नागिरी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील कापूरबाव (कर्पूरेश्वर) तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणा-या प्रकल्पातील कामांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता व निधी मुक्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्रमांकः रासयो-२०१३/प्र.क्र.१५०/तां.क.३
नवीन प्रशासन भवन,१५ वा मजला,हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १७ जानेवारी, २०१८.

वाचा -

१) पर्यावरण विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय,दिनांक: ७ जानेवारी, २०१६.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे पत्र जा.क्र. जि.प/ ग्रापापु/ कावि/८-वशि/८७६/२०१६, दिनांक ६.५.२०१६.
३) शासन पत्र क्रमांक रासयो २०१३/प्र.क्र.१५०/ तां.क.३, दिनांक २ जून, २०१६
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे पत्र जा.क्र. जि.प/ ग्रापापु/ कावि/८-वशि/४७८/२०१६, दिनांक २९.६.२०१६.

प्रस्तावना -

राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेमार्फत प्राप्त मौजे वाडी रत्नागिरी येथील कर्पूरेश्वर तलावाच्या संवर्धन प्रस्तावास संदर्भाधीन दिनांक ७ जानेवारी २०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.उपरोक्त तलावाच्या संवर्धनाच्या अनुषंगाने मंजूर करण्यात आलेली कामे राबविण्यासाठी संदर्भाधीन दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ५०.०० लक्ष (रुपये पन्नास लक्ष फक्त) इतका निधी मुक्त करण्यात आला होता. सदर रक्कमेचा पूर्णपणे विनियोग झाल्याबाबत संबंधितांनी उपयोगिता प्रमाणपत्र, पाण्याचा गुणवत्ता अहवाल, कामाचा भौतिक व वित्तीय प्रगती अहवाल, त्रयस्थ संस्थेचा अहवाल, Third part Audit Report, प्रकल्प सनियंत्रण समिती स्थापनेच्या आदेशाच्या प्रती इ. जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी सादर केले आहे. उपरोक्त कागदपत्राच्या आधारे तसेच एकूण खर्चाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या हद्दीतील मौजे वाडी रत्नागिरी येथील कर्पूरेश्वर तलावाच्या पर्यावरण संवधनासाठी झालेल्या खर्चास उर्वरित निधी मुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

१. राज्य योजनेखाली राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या हद्दीतील मौजे वाडी रत्नागिरी येथील कर्पूरेश्वर तलावाचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी संदर्भाधीन दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे राज्य हिश्श्यापोटी एकूण रुपये २,१५,०२,८१४/- (रुपये दोन कोटी पंधरा लक्ष दोन हजार आठशे चौदा फक्त) इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. मंजूर रक्कमेपैकी आतापर्यन्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना रक्कम रुपये ५०.०० लक्ष (रुपये पन्नास फक्त) इतका निधी वितरित करण्यात आला असून आता या शासन निर्णयान्वये मुख्य कार्यकारी

अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना मौजे वाडी रत्नागिरी येथील कर्पूरेश्वर तलावाच्या संवर्धनासाठी उर्वरित कामे राबविण्यासाठी पुढील हप्ता एकूण रुपये ६०.०० लक्ष (अक्षरी रुपये साठ लक्ष फक्त) इतक्या रकमेस मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत मौजे वाडी रत्नागिरी येथील कर्पूरेश्वर तलावाच्या पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी राज्य हिश्श्यापोटी देय एकूण मौजे वाडी रत्नागिरी येथील कर्पूरेश्वर तलावाच्या संवर्धनासाठी राज्यहिश्श्यापोटी एकूण रुपये २,१५,०२,८१४/- (रुपये दोन कोटी पंधरा लक्ष दोन हजार आठशे चौदा फक्त) इतक्या मंजूर रकमेपैकी पुढील हप्ता म्हणून रुपये ६०.०० लक्ष इतकी रक्कम खर्च करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

३. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर (Chief Executive Officer, Kolhapur) यांचे नांवे रुपये ६०.०० लक्ष (रुपये साठ लक्ष फक्त) एवढया रकमेचा धनादेश काढण्यात यावा.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना अदा करावयाची रक्कम रुपये ६०.०० लक्ष (रुपये साठ लक्ष फक्त) एवढी रक्कम अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री. म.रा. बंदपट्टे, अवर सचिव, पर्यावरण विभाग व नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. म.बा. हजारी, उप सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना रुपये ६०.०० लक्ष (रुपये साठ लक्ष फक्त) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाव्दारे वितरित करण्याची कार्यवाही करावी.

५. सदर प्रयोजनार्थ होणारा खर्च हा मागणी क्र. यू-४, ३४३५ परिस्थितिकी व पर्यावरण ०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण, १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना -राज्य योजनांतर्गत योजना, (०२),पर्यावरण प्रतिबंध, (०२) (०७), राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना (३४३५ ०१८२), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या मुख्य- लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ वर्षात अर्थसंकल्पित रु.९००.०० लक्षच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली वर्गीकृत करण्यात यावा

६ हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १५०/१४६१, दिनांक १३.३.२०१३ अन्वये तसेच वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दिनांक १८ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद क्र.७ ते १८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. तसेच प्रमाणित करण्यात येते की, दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्टातील अनु.क्र. ३ व ८मधील अटींची पूर्तता होत आहे तसेच वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१६/प्र..क्र.८९/अर्थ-.३, दिनांक २० एप्रिल,२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील ३ व ९ मधील अटींची पूर्तता होत आहे.

७. याशिवाय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ -३, दिनांक ३० जून, २०१७ अन्वये परिच्छेद क्र.४ मधील खालील बाबींची पूर्तता होत आहे.

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी वितरित करण्यात आलेल्या अनुदानाचा १००% विनियोग पूर्ण केला असल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे.
२. विभागाकडे विभागाच्या हया लेखाशिर्षाखाली संक्षिप्त देयकावर घेतलेल्या निधीचे तपशीलवार देयक प्रलंबित नाही .

३ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी लगतच्या मागील महिन्याची बँक अकाउंट स्टेटमेंट (Bank Account Statement) शासनास सादर केली आहेत. तसेच विभागामार्फत आतापर्यन्त करण्यात आलेला खर्च ७०% च्या मर्यादेत आहे.

४ .परिच्छेद क्र.४ मधील ४ ते १५ या बाबी लागू नाहीत.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२०६१२३०५०१५०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Manohar Ramchandra Bandpatte

Digitally signed by Manohar Ramchandra Bandpatte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Environment Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0cfbfeeede9517aa9b96ad1d49625c9c5ad8e7d6dc787d92279da33b569805fb, serialNumber=bb7b9a28cd6d8e2b1fa8f60d210258464e6ece204d02617fbb7ed6be3db6752c, cn=Manohar Ramchandra Bandpatte
Date: 2018.02.06 12:36:49 +05'30'

(मनोहर रा. बंदपट्टे)
अवर सचिव, पर्यावरण विभाग
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),महाराष्ट्र १/२,मंबई/ नागपूर.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर
५. जिल्हाधिकारी, जिल्हा कार्यालय, कोल्हापूर
६. अधिदान व लेखा अधिकारी, मंबई.
७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
८. मा.मंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
९. मा.राज्यमंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मंबई.
११. प्रधानसचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मंबई.
१२. वित्त विभाग (कार्यासन क्रमांक व्यय-१६/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई.
१३. नियोजन विभाग, कार्यासन क्र.१४७२, मंत्रालय, मंबई.
१४. रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवडनस्ती.